REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# आचार्य विनोबा भावे यांचे तात्विक शैक्षणिक विचार

भोईटे सुनिल बबनराव
मानसशास्त्र व तर्कशास्त्र विभाग ,
चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय,शिरूर.



## प्रस्तावना :

विनोबा भावे एक तत्त्वज्ञानी, कवी, समाजसेवक, प्रवचनकार, देशभक्त, मातृ—पितृ भक्त, गुरुभक्त या सर्वच संकल्पना त्यांच्या बाबतीत खर्‍या आहेत. गांधीजींचे मानसपुत्र म्हणून देखील त्यांचा उल्लेख केला जातो. गांधीजी एकदा आश्रमात असताना विनायक ऐवजी विनोबा अशी त्यांना हाक दिली तेव्हापासून ते विनोबा या नावाने ओळखले जाऊ लागले. विनोबा म्हणत "माझे जीवन चरित्र कोणीही लिहू नये कारण हा माझ्या जीवनातला आजचा भाग आंतरिक आहे. तो माझा मलाच माहित आहे फक्त. इतरांना त्याबद्दल काय माहीत असणार माझं आत्मचरित्र मीच लिहीलं तर ते जगाला कळेल."

आचार्य विनोबा भावेंची आणि आपली त्यांच्याबाबत ची ओळख ही भूदान चळवळ एवढी आहे. जे लोक भूमिहीन आहेत अशा तळागाळातल्या लोकांना समाजातील सधन लोकांनी आपल्या जमिनीचा हिस्सा दान करणे ही भूदान चळवळीची भूमिका होती. या अनोख्या जगावेगळ्या चळवळीचे जनक म्हणून विनोबांचे नाव भारताच्या व जगाच्या इतिहासात अजरामर झालेले आहे. हजारो मैल चालून विनोबांनी ४० लाख एकरापेक्षा जास्त जमीन भूमिहीनांसाठी मिळवण्यात यश मिळवलेले होते. प्र. के. अत्रे म्हणतात "त्यांच्याइतका मोठा जमीनदार सा-या देशात दुसरा कोणीही नसेल. जमिनीच्या छोट्या तुकड्यासाठी एकमेकांच्या जीवावर उठणारे लोक जगभर आहे. त्यापायी मोठाली युद्धही झाली पण ही अशाप्रकारची तात्विक चळवळ जगभर कधीही कुठेही झाले नाही आणि होणारही नाही. ही संपूर्ण चळवळ सत्य व अहिंसा या मार्गावर आधारित होती आणि म्हणूनच या चळवळीला अतिशय महत्त्व दिलं जातं आणि ही चळवळ अतिशय यशस्वी देखील झाली. मात्र याठिकाणी आपण केवळ भूदान चळवळी विषयी केवळ विनोबांचे विचार होते असे म्हणतो. पण त्याहीपेक्षा आणखी विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी विचार मांडले, समाज जागृत केला आणि देशासमोरच्या समस्या सोडवण्यासाठी आपल्या मौलिक विचारांचा ठेवा समाजाला उपलब्ध करून दिला म्हणूनच त्यापैकी एक शिक्षण ही एक व्यवस्था कशी असावी याविषयी देखील विनोबाजी आपले विचार मांडले आणि ते विचार जाणून घेऊन त्याविषयी अधिक चिकित्सा करण्याची आज वेळ आलेली आहे म्हणूनच याविषयीची आचार्य विनोबा भावे यांची शिक्षण विषयक संकल्पना काय आहे याचा अधिक विचार या ठिकाणी करत आहे. मात्र त्याबरोबरच अनेक क्षेत्रांमध्ये विनोबांच्या कार्याचे योगदान फार मोठे आहे शैक्षणिक क्षेत्र हे त्यापैकीच एक आहे. आजच्या शैक्षणिक समस्या व त्यावरील उपाय योजना विषयक अनेक समस्यांचा उलगडा आपणाला होत नाही. याविषयी विनोबाजींच्या वैचारिक चिंतनाचा शिक्षण विषयक सात्विक भूमिकेचा आजच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यास उपयोग होईल काय? याचा शोध निबंधात विचार करणार आहे.

आज सुशिक्षितांचे प्रमाण वाढले आहे पण त्याचबरोबर बेरोजगारी देखील वाढली आहे पण. सुशिक्षितांकडे आवश्यक ते स्किल नाही. उद्योग, व्यावसायिक स्किल नसल्यामुळे पारंपरिक शिक्षणाला मर्यादा आहेत. त्यामध्ये बदल होणे आवश्यक आहे. याची उत्तरे मिळविण्यासाठी विनोबा भावे यांचे शैक्षणिक विचार कसे मदत करू शकतील हा विचार करणार आहे.

शिक्षण विषयक विचारांच्या बाबतीत विनोबा भावे म्हणतात, "ज्ञान आणि कर्म या दोन्ही गोष्टी कापडाच्या उभ्या आणि आडव्या तंतू सारख्या आहेत. दोन्हीं एकत्र आल्याने कपडा विणाला जाऊ शकतो. जीवनाची चादर तयार होते. पण आपल्या

समाजात तर या दोन्ही धाग्यांना वेगवेगळे ठेवले जाते. एकाला श्रेष्ठ व दुसरा कनिष्ठ मानलं जातं मग हे वस्त्र कसे विणले जाईल? बुद्धिवादी श्रेष्ठ व कर्मवादी कनिष्ठ असा भेदभाव विकासाला मारकच आहे. सध्याची मुले विद्यार्थी असतात किंवा शिक्षण घेत असतात. म्हणजे काय करतात तर काहीही काम करीत नाही, कोणाची ही सेवा करीत नाहीत फक्त पुस्तकी ज्ञान घोकंपट्टी करून शिकतात. पण हे सगळं ज्ञान सेवा भावाच्या अभावी शून्य आहे."

शैक्षणिक विचारांबाबत बोलताना विनोबा भावे म्हणतात, "प्रत्यक्ष जीवनापासून विचारांची फारकत झाल्यामुळे विचार निर्जीव बनतो. आणि जीवन विचार शून्य बनते मनुष्य घरामध्ये जगत असतो आणि शाळेत जाऊन विचार करु शकतो असं करण्यामुळे प्रत्यक्ष जीवन आणि विचार यांचा आपसात मेळ जमत नाही. यावर उपाय म्हणजे एका बाजूनं घरामध्ये शाळेचा प्रवेश झाला पाहिजे आणि दुसरीकडून शाळेत घर शिरले पाहिजे. समाजशास्त्राच्या मार्फत शालीन कुटुंब निर्माण केली गेली पाहिजेत आणि शिक्षणशास्त्राने कौटुंबिक शाळा निर्माण केल्या पाहिजेत. छात्रालय किंवा शिक्षकांचे घर यांनाच शिक्षणाचा पाया म्हणून त्यावर शिक्षणाच्या इमारतीची रचना असावी. शाळा म्हणजेच कौटुंबिक शाळा होय." विनोबा भावे पुढे असेही म्हणतात, "शिक्षणामध्ये सार्थकते पेक्षा साक्षरतेकडे अधिक लक्ष पुरविले जाते. पण असं करणं आत्मघातच होय. शिक्षणाची माझी छोटी व्याख्या आहे सत्संगती, आणि मोठी व्याख्या आहे आत्मज्ञान ज्याला तुम्ही बौद्धिक शिक्षण म्हणता त्याला मी म्हणतो त्यांनी बुद्धीचा विकास होतो हा निव्वळ भ्रम आहे."

बुद्धी सोबतच शरीराचा विकास घडवायला या बाबतीत विनोबा म्हणतात, "शरीरश्रम करणा-या लोकांपर्यंत ज्ञान जाऊन पोहोचत नाही आणि ज्यांच्या बुद्धीचा विकास झालेला नाही ते लोक काम करायला तयार होत नाहीत. प्रत्येकाला डोकं आणि हात-पाय असं सर्वकाही दिलेले आहे. त्या सगळ्यांचा एकत्रित उपयोग नको का करून घ्यायला." आजच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षित असल्यामुळे काम करण्याची लाज वाढली आहे. गांधीजींची व विनोबाजींची श्रमप्रतिष्ठा सुशिक्षित पिढीने अंगीकारणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांमध्ये आणि एकूणच समाजामध्ये सेवा भावाचा अभाव असल्याचे आज दिसून येते. सेवा भावाचा अभाव याविषयी विनोबा काही मतं मांडतात आणि त्यामध्ये ते म्हणतात, "ज्या मुलांना कुठलंही काम करता येत नाही ती मुलं भविष्यात काही कर्तृत्व करून दाखवतील अशी आशा बाळगायला नको. चालू घरीच या शिक्षणानं व्यावहारिक, पारमार्थिक, औद्योगिक कुठल्याही प्रकारचे ज्ञान मुलांना प्राप्त होत नाही. चालू घडीचे शिक्षण विद्यार्थ्यांना चंगळवादी बनवत आहे. खरं तर मुलांनी एकीकडे ब्रह्मविद्याही शिकावी. औद्योगिक शिक्षण घ्यावं आणि दुसरीकडे झाडू मारणे, स्वच्छता करणे, शेती करणे, याही गोष्टी कराव्यात पण मुलांना तर या दोन्हीपैकी कशाचंच ज्ञान दिलं जात नाही, मुलं आपल्या दोन्ही हातांचा आणि दहा बोटांचा वापर करायला शिकत नाहीत. फक्त तीन बोटात पेन धरून कारकुनी करायला शिकतात. हे असंच जर चालू राहिलं तर देशाची उत्पादकता आणि संपन्नता कशी वाढणार." विनोबाजींनी हा निर्माण केलेला प्रश्न आजही आपणाला जाणवतो. यावर उत्तर शोधणे आजच्या शिक्षण पद्धतीने आवश्यक आहे.

विनोबा भावे शैक्षणिक विचारांबाबत बोलताना म्हणतात, "मुलांनी सध्याच्या शिक्षण पद्धती विरुद्ध बंड करावं पण बंड म्हणजे तरी नेमकं काय याविषयी बोलताना विनोबा म्हणतात बंड म्हणजे मुलांनी कॉलेज सोडून गावोगावी जावं, लोकांची सेवा करावी असं केल्याने कॉलेज ओस पडतील आणि मग सरकारवर शिक्षण पद्धती बदलण्याचे दडपण येईल." या पद्धतीने बहिष्काराचे शस्त्र सत्य व अहिंसेच्या मार्गाने वापरल्यास सरकारला याविषयी निश्चितच मार्ग काढता येऊ शकेल. आज आपण पाहतो विद्यार्थी हे विद्यार्थी न राहता ते परीक्षार्थी होताना दिसतात. याविषयी देखील विनोबा विचार मांडतात आणि त्याविषयी ते म्हणतात, "आजचा विद्यार्थी हा परीक्षार्थी बनून गेला आहे. तो ज्ञान मिळवत नाही. फक्त कुठल्यातरी विषयाची माहिती मिळवतो तीही पाठांतर करून. प्रत्यक्ष जीवनाचा त्याला काहीही अनुभव नाही पस्तीस टक्के गुण मिळाले की तो पास होतो. एक डिग्री हाती पडते आणि त्याला असं वाटायला लागतं की आपण सुशिक्षित झालो आहोत आणि मग तो खुर्चीवर बसून राहतो. एखादी नोकरी शोधतो आता अंगमेहनत किंवा सेवा करण्याची त्याला लाज वाटायला लागते. नोकरी मिळाली नाही की बेकार बेकार अशी ओरड सुरू होते. आणि ही तरुण मंडळी असंतुष्ट पणे वागायला लागतात." नवीन बदल स्वीकारायला ही मंडळी तयार नसतात. काळानुरूप बदल स्वीकारून तशी स्किल अवगत केल्यास युवावर्ग रोजगारक्षम होऊ शकेल.

आचार्य विनोबा विद्या आणि अविद्या याविषयी सांगतात, "विद्यार्थी विद्या म्हणून जे मिळवतात ते प्रत्यक्ष विद्या नसते. ज्याप्रकारे सूर्य उगवला की लौकिक भाग आपल्या समोर स्पष्ट पणे उभा राहतो पण जो सृष्टीतला तारकामय भाग आहे तो मात्र झाकला जातो. त्याचप्रमाणे तथाकथित विद्येच्या सूर्यप्रकाशात विद्यार्थ्याला एहिक माहिती मिळते पण आंतरीक अज्ञान मात्र त्याच्यापासून दूर जातं." म्हणजेच विद्यार्थी केवळ बाह्य जगताचा विचार करतो व त्याचे अवलंबित्व वाढते तो स्वत:च्या मूळ क्षमता, गुणवत्ता, सर्जनशीलता मात्र विसरतो. त्याला याची जाणीव करून देणे आवश्यक आहे.

इंग्रजी शिक्षण पद्धती मधील दोष किंवा उणिवा याविषयी सर्व जण बोलतात. त्याच पद्धतीने विनोबा भावे यांनी देखील काही मुद्दे मांडले होते आणि त्याविषयी ते सांगतात, "इंग्रजांनी जी शिक्षणपद्धती भारतात प्रचलित केली ती स्वत:चा स्वार्थ ध्यानात

ठेवून. त्यांना आपल्या राज्यकारभारात बाबूलोक हवे होते, कारकून हवे होते त्यामुळे त्यांनी कारकुनांना तयार करु शकेल अशी शिक्षणपद्धती राबवली. शिवाय त्यांना भारतामध्ये गुलामगिरीही टिकवून ठेवायची होती. त्यामुळे गुलामीची वृत्ती कायम कशी राहील हेच त्यांनी पाहिलं. संपूर्ण हिंदू समाज वैदिक संस्कृतीच्या आधारानं हजारो वर्ष जगला होता. त्यांच्या या श्रद्धास्थानवरच आघात करून त्यांच्या बुद्धीत भ्रम कसा निर्माण करता येईल हेच ब्रिटिशांनी त्यांचे धोरण ठेवलं. 'फोडा आणि झोडा' हीच त्यांची नीती होती. त्यासाठी संस्कृत भाषेला समाजातून नामशेष करणं जरुरीचं होतं म्हणून त्यांनी इंग्रजी भाषेचा बागुलबुवा निर्माण केला आणि त्यांचा हा दुष्ट हेतू साध्य केला. याचा आपण आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ७० वर्षे झाली तरी अनुभव घेत आहोत. ज्याला इंग्रजी भाषा बोलता येते आणि साहेबी थाटात राहता येतं त्याला आपण सभ्य मानतो आणि भारतीय पोशाख घालून साधेपणानं पण आपले वैदिक ज्ञान प्राप्त करणा-याला किंवा सेवाभावाने सतत कार्यरत राहणा-यांना आपण गावंढळ मानतो." विनोबा पुढे म्हणतात, "शरीरात जसे वात–पित्त–कफ असे त्रिदोष असतात. तसेच मला या शिक्षण पद्धतीत फरक आणि दोष दिसतात एक म्हणजे इंग्रजांनी जे शिक्षण दिलं ते विदेशी होतं आणि त्यातून विद्वान आणि अविद्वान असे दोन भेद निर्माण झाले. दुसरा दोष असा की जे शिकले ते वरच्या स्तराला गेले आणि जे शिकले नाहीत ते अगदीच खालच्या पातळीवर गेले. आणि माझ्यामते इंग्रजांनी राबविलेल्या शिक्षण पद्धतीत सर्वात मोठी उणीव राहून गेली आहे ती अशी की शिक्षणाला कामाची जोड दिली गेली नाही. आजचे शिक्षण व्यवसायभिमुख नसून अनुत्पादक आहे." म्हणून विनोबांच्या दृष्टीने व्यवसायाभिमुख शिक्षण पद्धती निर्माण होणे व ती काटेकोरपणे राबवली जाणे ही आजच्या काळाची प्रमुख गरज आहे.

वास्तवात दिल्या जाणा-या शिक्षणाविषयी आणि नवीन शिक्षणपद्धती कशी असावी याविषयी आचार्य विनोबा म्हणतात, "मला जर कोणी शिक्षण पद्धती कशी असावी असं विचारलं तर मी मुलांना सुट्टी देईल आणि म्हणेन मुलांनो हसा, खेळा, थोडे शेतीचे काम करा, स्वराज्याचा आनंद उपभोगा तोपर्यंत हिंदुस्थानातले शिक्षण तज्ञ एकत्र येऊन तुमच्यासाठी नवीन शिक्षणपद्धती तयार करतील." विनोबांची शिक्षण विषयक तळमळ पाहता ती त्या काळाची व आजची देखील खरी गरज असल्याचे जाणवते म्हणून असे बदल शिक्षण पद्धतीत होणे आवश्यक आहेत.

विनोबा पुढे शिक्षण पद्धतीवर आणखी काही चर्चा करतात आणि म्हणतात, "शिक्षणाच्या आधारावर चांगला समाज घडायला हवा. म्हणून शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे." पण त्याची रूपरेषा बदलण्याची अत्यंत गरज असल्याचे विनोबाजींनी जवळपास पन्नास वर्षांपूर्वी जे सांगून ठेवलं होतं तेच आजही लागू होतं. भारताचे दुर्दैव असे की आपण अजूनही गुलाम आणि कारकून निर्माण करणा-या ब्रिटिश शिक्षण पद्धतीचेच शिक्षण घेतो आहोत. त्यामुळे याहून वेगळं आपली मुलं काही बोलू शकतील अशी आशाच करायला नको. हे वास्तव आपल्याला लक्षात आले पाहिजे.

दिले जाणारे शिक्षण सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त केलं जावं. सरकारने शिक्षकांना पगार द्यावा कारण ते सरकारचे कर्तव्यच आहे. पण ज्याप्रमाणे न्यायव्यवस्था स्वतंत्र आहे आणि सरकारच्या विरोधातही ती निकाल देऊ शकते त्याचप्रमाणे शिक्षण विभागही सरकारपासून मुक्त व्हायला हवा हे जर नाही झालं तर देश फार मोठ्या संकटात सापडू शकेल. शिक्षणाच्या बाबतीत याहून दुर्दैवी आणखी काहीही असू शकणार नाही.

स्वावलंबनाविषयी विनोबा म्हणतात, "साम्ययोग आणि स्वावलंबन या दोन्ही गोष्टी म्हणजे आपले दोन हात आहेत ते खराब झाले तर आपल्या समाजाला अवकळा आलीच म्हणून समजा. व या दोन गोष्टींच्या अभावी विद्यार्थी जे काही शिकत आहेत ते प्राणहीन शिक्षण घेऊन ते आत्मविश्वास शून्य बनत आहेत. त्यामुळे मुलांना साम्ययोग आणि स्वावलंबन या दोन्ही गोष्टी शिकवायला हव्यात. कष्टकरी सामान्य लोक आणि सुशिक्षित लोक यांच्यामध्ये एकी निर्माण करणं. या दोन्ही टोकांना जोडणारे हे काम शिक्षकांचे आहे हे त्यांनी केलं पाहिजे. " विनोबांनी मुलांची पाठ्यपुस्तक कशी असावीत आणि अभ्यासक्रम कसा असावा या बाबतीत आपली मतं व्यक्त केलेली आहेत. ते म्हणतात, "भारत हा खेड्यांचा देश आहे आणि या खेड्यांमध्येही वैविध्य आहे. त्यामुळे एकाच प्रांताशी निगडित असलेला अभ्यासक्रम सरसकट सर्वांना ठेवू नये. जो ज्या वातावरणात राहत आहे त्यांच्याशी संबंधित त्यांना शिक्षण दिलं जाणं जरुरी आहे." आज अशा प्रकारे विविधतेच्या पातळीवर स्थानिक गोष्टींचा अभ्यासक्रमामध्ये समावेश झाल्यास विद्यार्थ्यांमध्ये अधिक आकर्षण व आपलेपणा वाढेल.

शहर आणि खेडे यामध्ये दिल्या जाणा-या शिक्षणामुळे विषमता निर्माण होऊ नये अशीही विनोबाजींची इच्छा होती ते म्हणत, "खेड्यातल्या मुलांना सेवेचे शिक्षण दिलं जावं आणि शहरातल्या मुलांना देशाला लुटण्याचे शिक्षण दिलं जावं असं होता कामा नये. आम्ही जेव्हा भूदान यात्रेला जातो तेव्हा वाटेत गावोगावी थांबत असतो. तिथल्या शिक्षकांना जेव्हा मी विचारतो की तुमची मुलं कुठे शिकतात तेव्हा शिक्षणाकरता या शिक्षकांच्या बायका आपल्या मुलांना घेऊन शहरात राहत असतात. म्हणजे जिथे शिक्षक, गुरु हजर आहेत तिथे मुले शिकत नाहीत का तर नवीन शिक्षण पद्धतीवर त्यांचा विश्वास नाही." आजही अनेक शिक्षकांची ची मुले ते शिकवीत असणा-या शाळेत न शिकता इतर शाळांमध्ये शिकताना दिसतात हा परस्पर विरोध लोकांच्या निदर्शनास येत आहे.

विद्यार्थ्यांचा विकास होणे आवश्यक आहे अशी आज प्रत्येक पालकाची इच्छा असते. आज देखील या बाबतीत विद्यार्थ्यांमध्ये सद्‌गुणांचा विकास कसा करावा याबाबत विनोबाजींनी काही उपाय सुचवून ठेवलेले आहेत. "विनाकारण कसलेही भय बाळगू नये, भीती वाटल्यास देवाचे नाव घ्यावे, त्यामुळे पुढे भयाचा टिकाव लागत नाही. जमेल तेव्हा जमेल तितकी आणि जमेल त्या लोकांना मदत करावी. आपल्यालाही कधी ना कधी कुणाकडून तरी मदत मिळत असते ते कधीच विसरू नये. रोजच्या रोज आपल्या हातून घडणाऱ्या चुकांचा धांडोळा घ्यावा आणि त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा. जुन्या चुका पुन्हा नव्याने कधीच करू नयेत. प्रत्येक ठिकाणी पुढे पुढे करू नये. मारामा-या भांडणं करू नयेत. कुणाचं मन सुद्धा दुखवू नये. श्रम आणि उत्पादन केल्याविना भोजन करू नये. गुरुजनांची शक्य तितकी सेवा करावी. सरळ बोला आणि सरळ मनाने विचार करा. रोज नियमितपणे काहीतरी अभ्यास करत जा. रागावू नये राग दुर्बलतेचे लक्षण आहे. स्वत:कडे मोठेपणा घेऊ नये. विनम्रपणे वागण्यात खरा मोठेपणा असतो. स्वच्छता नीटनेटकेपणा आणि टापटीप या गुणांमुळे आपलं व्यक्तिमत्त्व उत्तम घडते. घरात उर्मटपणानं वागू नये. सर्वांमध्ये मिळून–मिसळून राहावं सर्वांशी गोड बोलावं, मर्यादाशील असावं, शक्तीच्या जोरावर कोणी आपल्यावर दबाव आणत असेल तर मुळीच दबून जाऊ नये, सत्याला धरून राहावं, नेहमी खरं बोलावं, दुस-यांमध्ये दोष पाहू नयेत पण दुस-या मधले गुण मात्र अवश्य घ्यावेत. दुस-याच्या आनंदात आपण आनंद मानावा इतरांचे अश्रू पुसण्यासाठी सदैव तत्पर असावे. उतावळेपणा आणि धांदरट पणा करू नये. शांतपणे आणि विचारी पणे वागावं प्रत्येक बाबतीत आपला स्वार्थ कसा साधला जाईल हे पाहू नये. आपण या जगात सुख उपभोगणे याकरता जन्माला आलेले नसून सेवा करण्याकरता आलो आहोत याचं भान ठेवावं. खादाडपणाने वागू नये. थोड्यात समाधान मानावे. गैरवर्तन करण्याची लाज वाटली पाहिजे. विनाकारण शारीरिक त्रास देऊ नये. शारीरिक त्रास असेल तर शांतीला धरून राहावं कुणाचा हेवा मत्सर करू नये. कोणाला तुच्छ लेखू नये स्वत:चा मोठेपणा मिरवू नये. परीक्षेत कॉपी करू नये ही सुद्धा एक प्रकारची चोरीच असते. नेमाने काहीतरी शारीरिक कष्ट करावेत त्यातून मिळणारा पैसा समाजोपयोगी कामाकरता खर्च करावा. यामुळे मनात श्रमप्रतिष्ठा निर्माण होईल. समाजाला काहीतरी देत राहण्याची चांगली सवय जडेल. सुट्टीच्या काळात आसपासच्या गावात जाऊन स्वच्छतेची कामं करावीत किंवा इतर कुठलं ना कुठलं तरी सामाजिक कार्य अवश्य करावं. सर्व धर्मियांच्या आणि सर्व जातीच्या मुलांशी मैत्री करावी. मनात भेदभावाला थारा देऊ नये आपली राष्ट्रभाषा हिंदी अवश्य शिकून घ्यावी. भारतातील कुठल्याही प्रांतातील लोकांशी संपर्क साधताना या प्रभावी भाषा माध्यमाचा खूप उपयोग होत असतो. रोज नियमितपणे थोडा तरी व्यायाम करावा. लवकर झोपून लवकर उठावे. रात्री उशिरापर्यंत जागून केलेल्या अभ्यासापेक्षा ब्राह्ममुहूर्तावर केलेला अभ्यास जास्त चांगला लक्षात राहतो." विनोबांनी सांगितलेली ही मार्गदर्शक दिशा प्रत्येकाला स्वत:चे आयुष्य अधिक चांगल्या पद्धतीने जगण्यास मदतगार होईल.

अभ्यास आचार्य आणि विद्यालय याविषयी विनोबांनी आपली ठाम अशी काही मत मांडली आहेत. ती मते मांडताना ते म्हणतात, "तासन्तास अनेक विषयांचा अभ्यास करतच राहणारा, घोकंपट्टी करणे म्हणजे अभ्यास नाही. त्याऐवजी गंभीरपणाने सातत्याने थोडा थोडा वेळ एखाद्या ठराविक विषयाचा अभ्यास करणं म्हणजे खरं अध्ययन होय. अशा अध्ययनाचा खरा उपयोग होतो. आचार्य किंवा शिक्षक म्हणजे काय आणि ते कसे असावेत याबाबत विनोबा असं सांगत की संस्कृत भाषेत शिक्षकाला आचार्य असे म्हणतात. आणि हा शब्द पुरेसा बोलका आहे. शिक्षक स्वत: चांगले आचरण करून दाखवतो आणि इतरांकडून चांगले आचरण करून घेतो तो आचार्य. हिंदुस्थानात आचार्यांना जितका आदर दिला जातो तितका अन्य कुठल्याही देशात दिला जात नाही. म्हणूनच येथे 'आचार्य देवो भव' असं म्हटलं जातं." आज ख-या अर्थाने शिक्षकाने विद्यार्थ्यांना आदर्शाबद्दल सांगताना स्वत:चा देखील आदर्श समोर ठेवणे उचित ठरेल. शेवटी मुले ही आपल्या आई-वडील किंवा पालकांपेक्षा गुरुजनांना अधिक जवळचे समजतात.

शाळा महाविद्यालये किंवा शैक्षणिक संस्था कशा असाव्यात याविषयी बोलताना विनोबाजी म्हणतात की, "मुलांना शाळेत जे शिकवलं जातं त्याचा आणि प्रत्यक्ष जीवनाचा काही ताळमेळ बसत नाही. तो ताळमेळ घालण्यावरचा उपाय म्हणजे एका बाजूनं घरामध्ये शाळेचा प्रवेश झाला पाहिजे आणि दुसरीकडून शाळेत घर शिरले पाहिजे. समाजशास्त्राच्या मदतीने शालीन कुटुंब निर्माण केली गेली पाहिजेत. आणि शिक्षणशास्त्राच्या माध्यमातून अनेक कौटुंबिक शाळा निर्माण केल्या गेल्या पाहिजेत. त्यांच्यामते छात्रालय किंवा शिक्षकांची घरे या छोट्या–छोट्या शाळा हायला हव्यात." अशा कौटुंबिक शाळांमध्ये काय काय शिकवलं जावं विद्यार्थ्यांनी कसं वागावं. त्याची विनोबांनी एक यादीच दिलेली आहे ती अशी, "ईश्वर उपासना, प्रार्थना, नामस्मरण, आहारशुद्धी, चित्तशुद्धी यासाठी आहार सात्विक हवा. तिखट, मसाले आणि इतर निषिद्ध पदार्थ टाळावेत. दुधाचा आहारात समावेश असावा. स्वयंपाकाच्या बाबतीत स्वयंपूर्णता (सैनिक, प्रवासी, ब्रह्मचारी, विद्यार्थी अशा सर्वांनाच स्वयंपाक करता येणे जरुरीचे आहे.) विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारची घरगुती कामे शिकून घ्यावे. आणि स्वच्छतेची ही सर्व कामे स्वत: करावी. अस्पृश्यतेचा निषेध करावा. सकाळ–संध्याकाळ शरीर स्वच्छता केलीच पाहिजे. पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष कर्म आणि उद्यमशीलतेवर भर दिला गेला पाहिजे. रोज तीन तास काहीतरी शारीरिक कष्ट

होतील असे काम, हलकासा व्यायाम, मोकळ्या हवेत खेळणे या गोष्टी आवश्यक आहेत, रोज नियमाने अर्धा तास तरी सूर्यनमस्कार घातले पाहिजे. खादी आणि इतर स्वदेशी वस्तूंचा वापर केला पाहिजे, आजारी माणसाची सेवा करण्याव्यतिरिक्त अन्य कुठल्याही कारणासाठी रात्री उशीरा पर्यंत जागणे निषिद्ध आहे. अगदी अभ्यासही रात्री जागून करणे अयोग्य आहे. उत्तम आरोग्यासाठी सात तासांची झोप आवश्यक असते. रात्रीचा आहार माफक असावा. संपूर्ण जेवण घेऊ नये. आरोग्य, व्यवस्था आणि अहिंसा या तिन्ही दृष्टीने असं करणं हितकारक असतं. सतत सावध राहून आपल्या आसपासचं वातावरण शांत आणि प्रसन्न राखलं पाहिजे. कौटुंबिक शाळांमधून अशा प्रकारचं वातावरण ठेवल्यामुळे मुलांचे शारीरिक आरोग्य जोपासलं जातं, शरीरसंवर्धन होतं, त्यांची मने प्रसन्न आणि पवित्र बनतात. आसपास सुसंवाद साधला जाऊन सामाजिक हित जपलं जातं. मुलांची उत्तम जडणघडण होते. त्याच प्रमाणे आजच्या काळामध्ये सोशल मीडिया वापराचे विधिनिषेध शिकवले जाणे आवश्यक आहेत. समाज माध्यमांमधील योग्या-अयोग्यतेमधील जाणीव करून देणे. टीव्ही सिनेमा यामधील टाकावू आणि टिकाऊ ज्ञान काय आहे याची फारकत कशी केली जावी याचेही भान निर्माण कसे होईल याची शिकवण कुटुंबामध्ये दिली जावी." कोणतेही कर्म कनिष्ठ किंवा श्रेष्ठ नसते तर सर्व कामे ही सारखीच असतात म्हणून 'कर्म ही पूजा' शिकविणे आवश्यक आहे. प्रत्येक समस्या तिचे उत्तरच घेऊन जन्माला येते याचे भान करून. समस्या ही समस्या नसून आपणाला स्वत:ला सिद्ध करण्याची ती संधी आहे असा समज मुलांमध्ये निर्माण करायला हवा असे म्हणता येते. शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला अनैतिकतेची वाढ कमी करण्यासाठी, समाजातील अमानविय व्यवहार कमी करण्यासाठी कौटुंबिक सदस्यांमधील सुसंवाद वाढणे आवश्यक आहे. हे साध्य करण्यासाठी विनोबा भावे यांनी सुचविलेली 'घराची शाळा व्हावी शाळेचे घर व्हावे' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे आवश्यक आहे.

## संदर्भः

१. अरुंधती खंडकर **(2013)** बर्ट्रांड  अर्थर रसेल, मुंबई, इंडस सोर्स बुक्स.

२. मंजूषा आमडेकर **(2016)** सेवा भावाचा कळस विनोबा भावे, कोल्हापूर, रिया पब्लिकेशन.

३. नारायणभाई देसाई, **(2009).** अज्ञात गांधी, पुणे : समकालीन प्रकाशन.

४. डॉ. दत्तात्रय पुंडे. (सं) **(1995)** गांधीवाद आणि आ.म.साहित्य, पुणे :प्रतिमा प्रकाशन.

५. दे. दि. वाडेकर, (सं) **(1974)** मराठी तत्वज्ञान महाकोष, पुणे : मराठी तत्वज्ञान महाकोष मंडळ. खंड १